

ओंकार अशोक झांजे
ॐली
२०५०

# ॐली2050

ओंकार अशोक झांजे

ई साहित्य प्रतिष्ठान

ॐली२०५०

लेखक : **ओंकार अशोक झांजे**
मु. ढालकाठी पो. बिरवाडी
ता. महाड जि. रायगड
402 302

संपर्क 7770099295

ईमेल omkar. zanje1@gmail. com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे . तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते .

प्रकाशक--- ई साहित्य प्रतिष्ठान

Whatsapp --- 771098084

www. esahity. com

esahity@gmail. com

प्रकाशन ---१४ ऑगस्ट २०१७ संत ज्ञानेश्वर जयंती

©esahity Pratishthan®2017

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध

आपले वाचून झाल्यावर आपण फॉरवर्ड करू शकता

हे पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचना व्यातिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी आवश्यक आहे.



नमस्कार मी ओंकार अशोक झांजे . .

कोकणातलं रायगड किल्याच्या सहवासात असलेलं महाड हे माझं गाव. .

मी सध्या पुण्यात AISSMS IOIT मध्ये तृतीय वर्ष इलेक्ट्रीकल इंजिनीयरिंग शिकत आहे.

शाळेत असल्यापासून पुस्तकं वाचण्याची खूप आवड होती. मला ऐतिहासिक पुस्तके वाचायला आवडतात.

तेव्हा वाचलेल्या पुस्तकांपैकी माझं आवडतं पुस्तक म्हणजे 'श्रीमान योगी ' वीणा गवाणकर यांनी अनुवाद केलेलं 'एक होता कार्व्हर' हेही तितकेच आवडायचं आणि एपीजे कलमांचं 'अग्निपंख' सुद्धा. .

माझ्या लेखनाबद्दल सांगायचं झालं तर लहानपणी छोट्या छोट्या काल्पनिक कथा लिहायचो. या शिवाय मला कविता लिहिण्याचा छंद आहे.

पुढे डिप्लोमा ला गेल्यापासून मराठी वाचन थांबलं . कारण कोणत्याच इंजिनीरिंग कॉलेजच्या लायब्ररीत मराठी (वाचण्याजोगी) पुस्तके नसतात. (हीच खंत)

पुढे नेट वरून माझी ओळख ईसाहित्य प्रतिष्ठानशी झाली आणि पुन्हा एकदा मराठी वाचनाच्या प्रेमात बुडालो. मी पहिलं वाचलेलं ईबुक स्मिता पाटील यांचे 'कलाटणी' माझं अजूनही आवडतं पुस्तक आहे.

मला डायरी लिहायची सवय आहे.

इंजिनीरिंगच्या परीक्षा झाल्यानंतर सहज डायरी लिहायला बसलो आणि मला ही कथा सुचली व मी ती पटकन लिहून काढली. मग टाईप करून माझ्या जवळच्या व्यक्तींना दाखवली व त्यांना ती खूप या आवडली. त्यांच्या प्रोत्साहनामुळे मी हि कथा आणखी लिहिण्यास सुरुवात केली.

आणि फायनली तयार झाली हि कथा. .

मराठी वाङ्मयाचा पाया रचणाऱ्या संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या जयंती निमित्त हे ई पुस्तक आपल्या चरणी अर्पण करताना खूप आनंद होत आहे.

या प्रवासात ई साहित्य टीमचं आणि सुनील सामंत सर यांचं मोलाचं योगदान आहे. हि कथा लिहून झाल्यावर टाईप सुद्धा करायचं होतं . या कामात मला माझी बाल मैत्रीण पल्लवी वणवे हिने खूप मदत केली. तिचे खूप आभार!! या शिवाय पहिला भाग लिहिल्यानंतर पुढे लिहिण्यासाठी मला ज्यांनी प्रोत्साहन दिले . अशा सर्वांचे मनापासून आभार!!

या कथेचा एक भाग दाखवल्यानंतर मला एका मित्राने लव स्टोरी लिहिण्याचे सुचवले.

त्यामुळे ही कथा लिहिताना ती कथाही डोक्यात होती. लवकरच ती सुद्धा टाईप करायला घेईल आणि आपल्या भेटीस एक नवी प्रेमकथा घेऊन येईल.

वेळ देऊन माझे मनोगत वाचल्याबद्दल खूप खूप धन्यवाद !!

हि कथा आपल्यास आवडेल अशी अपेक्षा व्यक्त करतो.

**ओंकार झांजे**

**14 ऑगस्ट 2017 (कालाष्टमी श्रीकृष्ण जयंती)**

**संत ज्ञानेश्वर महाराज जयंती**

अर्पणपत्रिका

मराठी भाषेवर प्रेम करणाऱ्या तमाम रसिकांना

हि कथा सादर अर्पण करत आहे.

धन्यवाद.



-ओंकार झांजे



" 2050... असं ऐकल्यावर तुमच्या मनात काय येतं?

आपल्याकडे 2050 साली काय असेल हे पाहणारी time machine नाहीये .

फक्त डोळे मिटा आणि imagine करा 2050 ..

तुम्हाला काय दिसलं??

चला तुमच्या मनातल्या गोष्टींचा प्रवास करू या..

Welcome to 2050 !!! "

# 1 विटी दांडू

●●●

" आजोबा . . . मी टेरेसवर खेळायला जातोय !" माझ्या चिमुकल्या नातवाने हाक मारली.

"बरं बरं सावकाश जा ली" मी म्हणालो.

हो! ली त्याचं नाव होतं. हे २०५०वं साल होतं. जशी जुन्या काळापासून पाच अक्षरी नावं, त्यानंतर चार अक्षरी नावं, आमच्या काळात तीन अक्षरी नाव, आमच्या मुलांच्या काळात निल वेद अशी दोन अक्षरी नावं ठेवण्याचं फॅड होतं. तेच पुढे सुरु राहिलं. आणि म्हणूनच कि काय नाव घ्यायला जास्त कष्ट घेता येऊ नयेत म्हणून माझ्या नातवाचं नाव ली असं ठेवण्यात आलं.

एव्हाना ४ वर्षाचा ली आपल्या सु, कि, प्ला या मित्रांसोबत टेरेस वर पोचला होता. मी मात्र निश्चिंत होतो.

तहान खूप लागली होती म्हणून मी पाणी प्यायला गेलो तर पाणीच नव्हतं. पाण्याचा recharge संपलेला त्यामुळे recharge करणे गरजेचे होते. मी माझा आयफोन चटकन काढून ईवॉटर ॲप उघडलं हश्श्

पण मोबाइलला रेंज नव्हती. त्यामुळे मी टेरस वर जायला निघालो. त्याच बहाण्याने मुलांना ही भेटता येईल म्हटलं. लॉक करून मी वर निघालो. वर पोरं कॉमप्युटर च्या स्क्रीन वर काहीतरी करत होती.

"काय रे पोरांनो काय करताय" मी विचारलं.

"आजोबा आम्ही विटीदांडू खेळतोय"

हे ऐकून मी चकित झालो. कारण तिथे कुठंच गोट्या दिसत नव्हत्या. मी कुतूहलाने पुढे बघायला गेलो तर computer वर हा विटीदांडू चा गेम चाललेला व हि पोरं बोटाने टच करून हा गेम खेळत होती.

मला आमचा काळ आठवला. आम्ही बालपणी गावी मातीत खेळायचो. फार सुंदर दिवस होते ते मी भानावर आलो. हे सन २०५० होते इथे काहींही होऊ शकतं हे क्षणभरासाठी मी विसरलो होतो.

तितक्यात माझा मोबाईल वाजला. . sms आला होता. .

Your water recharge of rs. 500 is successful. Thank you.

मी घरी आलो. पोटभर पाणी प्यालो.

दुपारचे २ वाजलेले. कधी डोळा लागला कळलंच नाही.

## 2 लीचं ऍडमिशन

●●●

मे महीना संपून जून महीना उजाडला होता. १५ जूनला सगळयांची शाळा सूरू होणार होती. ली आता ५ वर्षांचा झाला होता त्याला शाळेत टाकायला हवे होते. आम्ही सर्व रात्री जेवायला बसलो.

"लीं ला शाळेत टाकायला हवं" मी विषय काढला.

"हो आम्हीही तोच विचार करत होतो' निल उच्चारला.

"मग कधी जातोयस admission ला घेऊन त्याला" मी.

"बाबा अहो ली आता मोठा झालाय त्याचं तो घेईल कि admission" निल.

मी पुन्हा गडबडलो.

त्याच्या बोलण्यातील मोठा हा शब्द ऐकून मी पुरता भांबावलो.

ली ची मॉम ली कडे वळली

"काय रे घेतलंस का admission ?"

"नाही मॉम अजून "ली

"कुठल्या शाळेत घेतोयस" मी

"पतंजलीविद्यामंदिर. कॉम या वेबशाळेत घेणार आहे" ली

तंत्रज्ञान खूप पुढं गेलं होतं. आणि भारतात सुद्धा एवढी प्रगती होईल असं वाटलं नव्हतं.

पूर्वीच्या शाळांच्या जागी आता वेब शाळा आल्या होत्या. डिजिटल क्रांती का काय म्हणतात त्याचेच हे परिणाम

"पण ही वेबशाळा चांगली आहे ना" निलने विचारलं.

"हो डॅड सू कि पण तिथंच admission घेताहेत. " ली

"आणि बाकीचे कुठं घेणार आहेत रे" मी विचारलं.

"ते convent school. com ला "

मला हसू आवरेना. मी मनातल्या मनात हसू लागलो.

एवढ्यात tv वर बातमी आली.

भारतातील शेवटचा कागद पुण्यात बघण्यासाठी ठेवलाय.

लोकांची तुफान गर्दी शेवटचा कागद बघण्यासाठी.

पेपरलेस क्रांतीची हि कमाल होती.

आम्हीही उद्या सकाळीच फ्लाईट ने पुण्याला जायचं ठरवलं. इतक्यात चिमुकल्या ली चा प्रश्न

"आजोबा हे कागद म्हणजे काय असतं"

◆◆◆

## 3 मुंबई टू पुणे

●●●

रिमझिम पाऊस पडत होता. आम्ही मुंबईहून पुण्याला निघालो. मी पुन्हा flashback मध्ये . .

पूर्वी मुंबई पुणे म्हटलं की ती गाड्याची गर्दी ट्राफिक ऍक्सिडंट सर्व काही आलं.

सगळं काही आठवलं.

तितक्यात आमचं विमान लँड झालं.

आम्ही १५ मिनिटात पुण्यात पोचलो. ईशा आम्हाला न्यायला स्वारगेट एअरपोर्ट ला आली होती.

ईशा म्हणजे माझी भाची. पुण्यातील coep. com या नामांकित वेबकॉलेज मध्ये ती इंजिनियरिंग करत होती. तसं माझं BE पण पुण्यातूनच झालं होतं. पण तेव्हाचं पुणं आणि आत्ताचं पुणं यात जमीन आस्मानाचं अंतर होतं.

"काय ग आज कॉलेजला सुट्टी "मी विचारलं.

"नाही मामा कॉलेज आहे सुरु मीच आले इकडे" ईशा

"म्हणजे लेक्चर बंक" मी

"हो तसंच काहीसं"

"अगं पण तुमचे लेक्चर तर ऑनलाईन असतात ना मग हे बंक वगैरे सगळं" मी कुतूहलाने विचारलं.

"हे बघ मामा आमचे जेव्हा जेव्हा ऑनलाईन लेक्चर असतात ना तेव्हा या आमच्या कॉलेजच्या या ऍप वर असा sms येतो.

Please attend the online m3 lecture at lab 112 at 11 am.

तेव्हाच लेक्चरला जायचं नाहीतर फिरत बसायचं.

जेव्हा आपल्याला बंक करायचं असेल तेव्हा आम्ही हे बंक बडी हे ऍप वापरतो. या मुळे येणारे sms अडवले जातात व ते उशिरा रिसिव्ह होतात हेच कारण द्यायचं कॉलेजला "

ईशा भरभर बोलत होती आणि मी स्वप्नवत असल्यासारखं ऐकत होतो.

"मामा तुमच्याकाळी कसं असायचं लेक्चर बंक "

मी सांगू लागलो. .

◆◆◆

## 4 पुणे मेट्रो

●●●

"मामा. . अजून एक दिवस थांब ना. . उद्या इथल्या मेट्रोचं लोकार्पण आहे. . " ईशा मला request करत होती.

"अच्छा म्हणजे पुणे मेट्रो चं उदघाटन"

"हो"

"अखेर तयार झाली म्हणायची स्वारगेट ते पिंपरी डेक्कन ते बंड गार्डन . . "

"अरे. . मामा ती जुनी झाली ती तुमच्या काळातली.

आता नवीन झालीये .

It's 2050 "

असं म्हणत तिनं मोबाईल मध्ये मला काही फोटो दाखवत म्हणाली "हे बघ हि पेठ मेट्रो. हि सर्व पेठ टू पेठ स्टेशन घेत कायम चालू राहते. सगळं instant झालंय आता

हि कॉलेज मेट्रो. हि सर्व वेबकॉलेज ला पार करत जाते. "

मी थक्क होऊन पाहत होतो.

"हि बघ underground metro. हि ट्राफिक कमी करण्यासाठी धावते. त्यामुळे आता पूर्वीसारखं ऑफिस च्या वेळेला ट्राफिक नाही होणार . "

आम्ही एअरपोर्ट ला पोचलो. परतताना आम्ही कात्रज एअरपोर्ट ला आलो होतो.

ईशा अजून सुद्धा मला विनवत होती.

"मामा उद्या सकाळी ७ वाजता या ट्रेन रुजू होणार आहेत.

आपण सकाळ च्या भक्ती मेट्रोने जेजुरीला जाऊ. "

क्षणभरासाठी मीही मन बदललं.

मी मागे वळलो. तोच ईशाचा फोन वाजला

तिच्या पुणे मेट्रो ऍप वर sms आलेला. .

Due to some technical issues pune metro will be launched next week

काही कारणांमुळे हि ट्रेन पुढच्या आठवड्यात चालू होणार होती.

आम्ही दोघेहि एकमेकांकडे पाहत राहिलो.

ईशाने म्हटल्याप्रमाणे सगळं कसं instant झालाय त्याचा चांगलाच प्रत्यय मला आला. .

मग मात्र ईशाने हसत हसत आम्हाला गुड बाय केले.

आणि आम्ही मुंबई कडे निघालो. .

◆◆◆

## 5 माझा स्वयंपाक

●●●

चला फायनली ली आज शाळेत जाणार होता.

पतंजलीविद्या मंदिर . com मध्ये !!

"मॉम आज डब्यात कांदेपोहे दे "

लीची ऑर्डर आली.

"हो . . आत्ता करते बघ. . बाबा . . हे बघा टू मिनिट नाश्ता मशीन कालच पतंजली मॉल मधून आणली. फक्त यात जिन्नस घालायचे आणि सेटिंग करायची कि झटपट नाश्ता तयार. "

"व्वा चांगलच आहे!!" मी म्हणालो.

"हो चांगलं तर आहेच पण उद्यापासून तुम्हालाच बनवायचा आहे म्हणून सांगते"

"अरेच्चा!! मी का बर ? मी चक्रावून विचारलं.

"अहो उद्या पासून माझ्या कामाची वेळ चेंज होतीये. त्यामुळे मला वेळ नाही मिळणार. सोप्पं आहे बघा तर. . "

मी मनातल्या मनात २ मिनिट नाष्टा आणि वेळ नाही मिळणार हीच समीकरण सोडवत होतो.

हो आणि खरंच दुसऱ्या दिवशीपासून तसं झालं.

"आजोबा , मला आज डब्यात गाजराचा हलवा पाहिजे" तिकडून राजेसाहेबांची फर्माईश आली.

"चला बनवूयात गाजराचा हलवा टू मिनिट मशीन बघूच कशी बनवते". मी मला माहित असलेले पदार्थ आत टाकले . मेनू select केला आणि cook बटन दाबलं. २ मिनिट होऊन गेली. तरीही काही वास येत नव्हता शिजल्याचा, तेवढ्यात ली आला. झाला का आजोबा ?

नाही रे , अजून हे cook होत नाही बहुतेक !

अहो यात तर साखरच नाही टाकली.

कशी काय ?

हे बघा इथ लाईट नाय पेटली अजून! म्हणजे कायतरी missing आहे.

कुठला पदार्थ राहिला ? हो हो साखरच , पण तुला कस कळल ?

कारण त्याची कारण त्याची जागा मॉम ने मलाच सांगितले फक्त !!

मी साखर टाकली.

आणि कूक बटन दाबलं!!

आणि हळूहळू खमंग वास येऊ लागला.

आणि अक्षरश 2 मिनिट मॅगी होते तसा गाजराचा हलवा तयार होऊन डिश मध्ये सर्व होऊन लगेच बाहेर आला. . !!!

कमालच आहे बुवा!!

"चल हे घे डबा निघ तू शाळेत नाहीतर उशीर होईल"

"बाय आजोबा"

मी हसत हसत ली ला बाय बाय केलं.

आणि काहीतरी चविष्ट बनवण्याचा प्लॅन केला.

◆◆◆

## 6 जन गण मन

●●●

हिवाळयाची सुंदर पहाट होती.

गर्द धुक्याने सगळ विश्व व्यापलेल.

आज मुंबईत खुप मोठा कार्यक्रम आहे.

"पंतप्रधान जन गन मन योजना" सफलपूर्ति निमित्त!

काय होती ही जन गन मन योजना ?

यासाठी आपल्याला खुप वर्षे मागे जावे लागेल.

खरंतर पूर्वी पासून भारताची लोकसंख्या प्रचंड होती.

चीन नंतर भारत अग्रेसर होता. परंतु लोकसंख्या सर्वेक्षणानुसार भारताचा लोकसंख्या वाढिचा वेग जास्त होता.

अशा रीतीने 2025 साल उजाडले.

भारताने लोकसंख्येचा उच्चांक गाठला.

जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश अशी नवी ओळख भारताला मिळाली.

या वाढत्या लोकसंखेबरोबर अनेक समस्या देशात बळावल्या.

साधन संपत्तीचे अपुरेपण, वाढते नागरी गुन्हे, बेरोजगार तरुण, प्रचंड महागाई; देशाची अर्थव्यवस्था मोडकळीस आली होती.

त्यातूनच अचानक एका मध्य रात्री पंतप्रधानांनी जाहिर केली नवी योजना -

"जन गण मन योजना"

सकाळी उठून सर्वांनी बातम्या पाहिल्या आणि लोकांची बोबड़ी वळली.

भारतात यापुढे आई वडिलांचं एकच अपत्य भारतीय नागरिक मानन्यात येईल. इतर अपत्यांना भारतीय नागरिक म्हणून कसलीच ओळख मिळणार नाही.

अर्थात हे नवविवाहित जोडप्यांपासून सूरु होणार होते.

भारतासारख्या लोकशाही असणाऱ्या देशात अशी योजना म्हणजे कोणालाच पटणारी नव्हती.

त्यामुळे देशात दंगल झाली. निषेध, तोड़फोड़ , आंदोलने. . .

परंतु मागे हटतील ते PM कसले.

त्यानी योजना मागे घेतली नाही.

त्या उलट "कमी लोकसंखेचे" फायदे कसे आहेत याचा प्रचार सगळीकड़े करायला सुरुवात केली.

खुप वर्षे लागली पण नंतर लोकांचा आक्रोश कमी झाला.

'हम एक हमारा एक'

'एक मैं और एक तू'

यासारख्या टैगलाइन सह सगळीकडे जाहिराती झळकु लागल्या.

आपल्या देशात खुप मोठी क्रांति घडू लागली.

पंचवीस वर्षे कशी गेली कळलच नाही!

आज भारताची लोकसंख्या 90 कोटि आहे.

फक्त!

जन गण मन योजना सफल झाली.

भारत पाचव्या स्थानावर गेला.

2050 मधे आणखी सुधारणा होऊ लागल्या

◆◆◆

## 7 विराचं लग्न

●●●

'निवती' एक नितांत सुंदर गाव!

गावाला असलेला विशाल समुद्र किनारा. .

कौलारू घरे नारळ पोफळीच्या बागा. .

ली आणि मी किनाऱ्यावर बसलेलो.

समुद्राचं निळेशार पाणी. .

त्यात सूर्य बुडत होता. .

थंडगार हवा सुटलेली. .

पाखरांचे थवे उडत होते. .

"चल ली परत जाऊ" मी म्हटलं.

"थांब ना आजोबा अजून"

"नको चल खूप दमलोय आज"

आज प्रवासातून आल्याने आम्ही खूप दमलेलो. त्यामुळे सगळे आज लवकर झोपले. मुंबई पासून दूर वर येण्याचं कारण म्हणजे विराचं लग्न. हो. . ईशाची लहान बहीण विरा हिचं लग्न. तिची इच्छा होती की माझं लग्न एका सुंदर खेड्यात व्हावं. तिच्या या हट्टामुळे तिचे आई वडील हैराण झाले होते. शेवटी त्यांनी ती जबाबदारी माझ्यावर सोपवली. सन 2050 साल त्यात शहरं अल्ट्रा स्मार्ट

झालेलीच पण गावं हि मॉडर्न झाली होती. त्यामुळे वीराला हवं असलेलं खेडं कुठं भेटणार हा यक्षप्रश्न होता. फायनली मला असंच एक गाव मिळालं. Development पासून दूर निवती. . शिवाय इथे आमचे दूरचे नातेवाईक राहतात. त्यामुळे तिथे राहण्याची सोय झाली. सगळी मंडळी आज निवतीत येऊन पोचली. ईशाचं लग्न होऊन २ वर्षे झाली होती. विराने mobile repairing कोर्स केलेला. तीचंच आता लग्न होतं. तिचा नवरा ओम FY BA ला होता.

हे ऐकून तुम्ही पण चक्रावला असाल. होय खरंय ते ! आज कालच्या शिक्षणामुळे लग्नाचं वय वाढत होतं. अगदी 30 - 32 पर्यंत यावर तोडगा म्हणून काही अक्कल हुशारांनी मुलामुलींचं लवकर लग्न करायला सुरवात केली आणि 18 वर्षातच लग्न करण्याचं फॅड निघालं. दोघांनी लग्नानंतर शिकायचं व शिक्षणाचा खर्च मुलीच्या सासर माहेरच्यांनी मिळून करायचा. हे indirect प्रकारचं 5G हुंड्याचं एक स्वरूप होतं.

असो तर असं ठरलं विराचं लग्न . या सुंदर वातावरणात हा सोहळा पार पडणार होता. त्यामुळे सर्वांनाच खूप उत्सुकता लागली. दोन दिवसांनी विराचं लग्न झालं. सर्वांचे डोळे भरून आले. सासर ची मंडळी पुण्याला रवाना झाली. आम्हीही काही वेळाने मुंबई ला परतलो. समुद्र किनारी निसर्गाच्या कुशीत झालेला हा सोहळा मनात कायमचा राहील. .

◆◆◆

## 8 गत वैभव

●●●

दोन महिने उलटून गेले. लीने हट्ट केला की विरा दिदीला भेटून यायचं. म्हणून आमचं विराकडे जायचं ठरलं. विरा आणि ओम आमच्या इथून जवळच पनवेलला शिकत होते. दोघेही फ्लॅट घेऊन राहत होते. मी विराला फोन केला. तिला येणार असल्याचं कळवलं. तिलाही आज सुट्टी होती.

"चल ली निघालास का? मोनो रेल पकडून जाऊ पनवेलला डायरेक्ट" मी म्हणालो.

ली तयार होऊन आला. आम्ही दोघेही मोनोत बसलो आणि चटकन पनवेलला उतरलो. आम्ही विराच्या घरी पोचलो. ओम आणि विरा दारातच वाट बघत होते. चहा पाणी झालं.

"चला मी इथल्या म्युझियमला तुम्हाला घेऊन जाते" विराने सुचवलं.

"ओके " सर्वांना कल्पना आवडली. आम्ही फ्रेश झालो. थोडा आराम केला आणि मग निघालो मुझियमला. .

हे म्युझियम विराच्या घरापासून जवळ असल्याने आम्ही पायी चालत निघालो. 10-15 मिनीटं चालल्यानंतर आम्ही म्युझियम समोर आलो. .

'गतवैभव'

हे त्या संग्रहालयाचे नाव होते.

"काय ग विरा ? काय इथली खासियत" मी

"मी आत्ता नाही सांगू शकत. तुम्ही स्वतःच जाऊन बघा, its surprise" विरा.

मी मनातल्या मनात गेस करत होतो. ली ला खूप attraction होतं. त्यामुळे तो धावतच सुटला. मग आम्ही पण त्याच्या मागे निघालो. म्युझियम मध्ये आम्ही प्रवेश केला. त्या भव्यदिव्य दालनात पोहोचताच डोळ्याचे पारणे फिटले. त्या तिथे गतकाळात नष्ट झालेल्या सर्व वस्तूचे नमुने पाहायला ठेवलेले. . गेल्या काही दशकांतील आपल्या जीवनातील ज्या गोष्टी पूर्णपणे गायब झाल्या होत्या त्या या ठिकाणी मांडलेल्या पाहून आम्ही सर्व रमलो. ली प्रत्येक वस्तू निरखून पाहत होता. त्याच्या साठी या सर्व गोष्टी नवीन होत्या. त्यामुळे तो explanation वाचत होता. आम्ही गतवैभव डोळे दिपवेस्तोवर पाहत होतो.

"आजोबा हा बघा कागद. . आपण असा सेम पुण्यात बघितलेला ना?"

Right ली ने लगेच ओळखलं.

ओम आणि विरा एका बाजूला त्या वस्तूंसोबत सेल्फी घेत होते.

इतक्यात ली किंचाळला. . . .

"इ हे काय आहे???? इतकं काळं काळं. . यालाच भूत म्हणतात का?" ली ने विरा ताईला विचारलं .

"अरे नाही हा एक पक्षी आहे . खूप वर्षांपूर्वी असायचा आपल्याकडे. " मी वळून पाहिले.

"ओह. . . . हा पक्षी"

"याचं नाव काय मग" ली.

"कावळा !!! " मी बोललो.

चिमणी वटवाघळं नामशेष झाल्यानंतर काही वर्षांनी कावळाही शहरीकरणामुळे नाहीसा झाला. त्याचाच इथं taxidermi बनवलेला. आणि तसंही चिमुकल्यांच्या गोष्टींतून चिऊ काऊ कधीच निघून गेले आहेत. या सर्व आठवणी पुन्हा ताज्या झाल्या.

"व्वाव. . आपला पूर्वीचा राष्ट्रीय प्राणी किती रुबाबदार आहे. .

Amazing. .

किती मोठा आहे याचं नाव! काय बरं? वाघ. . अरे हे तर आपलं आडनाव आहे. . "

एखाद्या alien planet वर नेल्यावर जसे expression असतात तसेच लीच्या चेहऱ्यावर होते.

"जीजू बघा ना कसला भारी वाघ आहे. . आमचं पण तेच आडनाव आहे'

यावर ओमने त्याला विचारलं. .

"बरं सांग मग आताचा राष्ट्रीय प्राणी कोण आहे?"

"माकड. . . " ली मोठ्याने ओरडला.

आणि आम्ही सगळे खिदळू लागलो.

अशा रीतीने आम्ही संपूर्ण दालन पाहिलं. आणि त्या दालनाच्या बाहेर पडलो. एका वेगळया विश्वातून बाहेर आल्यासारखं वाटलं मस्तपैकी आईसक्रीम खात आम्ही घरी परतलो.

◆◆◆

# 9 नवा पाहुणा

●●●

उन्हाळी सुट्टीचे दिवस होते. मी गाढ झोपेत होतो. ली ला ही सुट्टी असल्याने तोही निपचीत पडला होता. ऊन डोळ्यांवर आलं तेव्हा जाग आली. साधारण नऊ वाजले असतील मी फ्रेश होण्यासाठी उठलो आणि बाथरूम मध्ये गेलो. बाहेर आलो तरी ली अजून झोपलेलाच होता. मी हॉल मध्ये गेलो आणि नेट वरून मनाचे श्लोक प्ले केले. सकाळच्या वातावरणात खूप शांत वाटत होतं. शिवाय आज इतर कोणी घरी नव्हतं. मी खुर्चीवर बसून निवांतपणे ऐकत होतो.

"समर्थाचिया सेवका वक्र पाहे. . .

असा सर्व भूमंडळी कोण आहे?

जयाची कृपा वर्णीती तिन्ही लोकीं,

नृपेक्षी कदा रामदासाभिमानी. "

इतक्यात किंचाळण्याचा आवाज आला.

"आ. . . . मम्मी. . . "

तो ली चा आवाज होता. मी धावतच आतल्या खोलीत गेलो.

"काय झालं ली?"

आत बऱ्याच वस्तू अस्ताव्यस्त पडल्या होत्या. ली हात पुढे करत काहीतरी चाचपत होता.

"आजोबा काहीच दिसत नाहीये मला", ली म्हणाला.

"इकडे इकडे आहे मी", मी त्याला जाऊन पकडलं.

"काय झालं रे ?" मी.

"आजोबा काहीच दिसत नाहीये मला", ली

"चल इकडे ये बघू"

मग मी त्याला धरत धरत बाथरूम मध्ये आणलं आणि त्याच्या डोळयात पाणी मारलं.

"आता काही दिसतंय का?"

"अजूनही व्यवस्थीत दिसत नाहीये, मघाशी पुर्ण काळोख होता. आता अंधुक अंधुक दिसतंय; पण नीट नाही दिसत", ली.

"ये बाहेर ये", मी

आखिर जिस का डर था वही हो गया।

मी मनातल्या मनात पुटपुटलो.

"तू बस थोडा वेळ. सगळं ठीक होईल", मी

मी माझा आय फोन घेतला आणि डॉ. भानवसेंना फोन केला.

"हॅलो. . . डॉक्टर, लवकरात लवकर शेजारच्या विंग मध्ये या. पाटलांच्या इथं" मी फोन ठेवला. मी तो पर्यंत टू मिनिट मशिनीतून चहा बनवून घेतला. ली फार अस्वस्थ होता.

"घे थोडा चहा पी".

तरीही त्याची चूळबुळ थांबत नव्हती. दरवाजाची बेल वाजली. मी रिमोट घेतला आणि दरवाजा ओपन केला.

"या. . . डॉ. भानवसे"

"नमस्कार. . " डॉक्टर.

"कुठे आहे ली ? " डॉक्टरांनी विचारलं.

मी दाखवलं.

डॉक्टरांनी तापसणी केली.

खर तर मला सगळं माहिती होत ; पण मी खात्री करण्यासाठी डॉक्टरांना बोलावलं. डॉक्टरांचं चेक अप झालं.

"काय झालं हो डॉक्टर ?"

"तोच आजार, तुमच्या घरातही आगमन झाल त्याचं. "

"खूप मोबाइल वापरतो का हा ?"

"हो", मी म्हंटलं.

त्याचेच दुष्परिणाम. 'टेम्पररी ब्लाईंडनेस'आलाय त्याला. मी खात्रीशीर झालो. हा आजार जवळजवळ सर्वच घरातल्या बालकांमध्ये पसरलाय. स्क्रीनचा अतिवापर यामुळे डोळयातील रेटीना आणि लेन्स वर परिणाम होऊन दृष्टी कमजोर होते आणि रोज सकाळी डोळयांसमोर काळोख येतो. मराठीत याच नाव

'दिवसांधळेपण' असं ठेवलं गेलं. रातांधळेपण, पोलिओ, काविळ यांसारखे जुने आजार पूर्णपणे नष्ट झाले होते आणि बदलत्या स्मार्ट पिढीसोबत आजार हि हायटेक झालेले. त्यातलाच हा एक रोग. डॉक्टरांनी स्टेरॉईडच्या गोळया दिल्या आणि निघून गेले.

" काळजी घ्या आता", जाता जाता सांगून गेले.

मी ली ला औषध दिले आणि थोड्या वेळाने त्याला दिसू लागले.

हुश्श. . . . !

"आता या गोळया रोज सकाळी घ्यायच्या. "

"मला नाही घ्यायच्या", ली केविलवाणा होऊन म्हणाला. मग असचं सकाळी वस्तू तोडत-फोडत बसशील रोज आंधळयासारखं चाचपडत.

"आज जशी हि फ्रेम फोडलीस ना तशीच", मी.

"काय. . . ?"

"माझी आवडती फ्रेम. . . ?"

ली ने ताबडतोब आपल्या फ्रेमकडे पाहीले, पण तिचा चक्काचूर झाला होता.

◆◆◆

## 10 एकुलती एक

●●●

"ओम. . . . ओम. . . . . . "

ओंकार ध्वनीचा उच्चार झाला. सकाळचे 6 वाजले होते.

" ली. . . चल बघू योगसाधना क्लास ला. . . " मी लीला हाक मारली.

लीला मी उठवलं आणि तयार केलं. योगासनाच्या क्लास साठी! भारत सरकारने नवीन योजना सुरू केली होती.

'योगायोग आरोग्य योजना'

या योजनेतून लहान मुलांना मोफत योगासने शिकवणार होते. शिवाय आमच्या कॉलनीतल्या मुलांसाठी हा क्लास कंपल्सरी केला होता. वरच्या मजल्यावर राहणारी परी मेहरा हे क्लास घेणार होती. कालच आम्ही रजिस्ट्रेशन करून आलो. आज पहिला दिवस म्हणून मी ली सोबत जायचं ठरवलं.

मी लीला घेऊन निघालो. ओंकार गुंजनाने सुरुवात झाली.

" ओम . . . ओम. . . " ध्वनी वातावरणात गुंजत होता . जणू काही positive लहरी निर्माण झाल्या होत्या . एकदम शांत वाटत होतं.

परी मेहरा ही प्रसिद्ध उद्योगपती नरेन मेहरा यांची एकुलती एक कन्या. एकुलती एक अर्थात ती त्यांची एकमेव मुलगी होतीच शिवाय नरेन तिचे एकमेव पालक होते. परील आई नव्हती . म्हणजे आई वारली किंवा सोडून गेली असं नाही. तर परी हि मेहरांची test tube baby होती.

IVF तंत्रज्ञानाने झालेली असल्याने तिचे सर्व काही तिचे वडील होते. या नवीन technology चा बऱ्याच लोकांनी वापर केला होता. एकल पालकत्व संकल्पना खूप खोल रुजली आणि त्याचेच एक उदाहरण म्हणजे नरेन मेहरा आणि त्यांची कन्या परी मेहरा. . !

इंडियन हेल्थ सर्वे नुसार या मुलांमध्ये नैराश्याचे प्रमाण अधिक होतं. ते परीच्या बाबतीत हि खरंच होतं. परी जसजशी मोठी झाली तसे तिला एकाकी वाटू लागले. तीपण depression च्या गर्तेत बुडाली. तिने आपलं मन इतर गोष्टींत रमावण्याचा खूप प्रयत्न केला. अखेर तिला रस्ता सापडला. तिने योगासने करायला सुरुवात केली. आणि त्यात पारंगत झाली. हि कला तिला इतकी आवडू लागली की तिने पुढे सरकारच्या योग योजनेत सहभागी होण्याचं ठरवलं.

हि सगळी हकीकत मला बाहेर बसलेल्या काकूंनी सांगितली. बघता बघता अर्धा तास उलटला. आज पहिला दिवस असल्याने क्लास लवकर सुटला. मी क्लास पाहण्यासाठी बाहेर थांबालेलो.

योगसाधना संपली. सगळेजण परिदीदीला बाय बाय करू लागले. तीही मुलांशी एकरूप झाली होती. खळखळून हसायला लागली. तिच्या चेहऱ्यावर हसू पाहून मला पण काही क्षणासाठी समाधानी वाटलं. परी आता एकटी नव्हती ती, आता सगळ्यांची झाली होती.

◆◆◆

## 11 श्री योग वर्ग

●●●

पुन्हा एकदा पावसाळा सुरू झाला. मुलांच्या सुट्ट्या संपल्या. ली आता पुढच्या वर्गात शिकायला गेला. त्याची ई शाळा एकीकडे व्यवस्थित चाललेली आणि दुसरीकडे पहाटेचे योगवर्ग सुद्धा नीट चाललेले.

अशातच ली ने एके दिवशी एक बातमी माझ्या कानावर घातली . .

"आजोबा उद्या पासून योग साधना बंद होणार आहे "

"का रे काय झालं" मी सहज विचारलं.

"परिताई क्लास बंद करणार आहे" ली म्हणाला.

संपूर्ण माहिती कळण्यासाठी मी परीच्या घरी गेलो. तेव्हा समजलं की परी प्रेग्नेंट आहे. होय ! आणि ते सुद्धा ती सरोगेट मदर झाली होती आणि एकटीच आपल्या मुलाला सांभाळणार होती. जसं तिला तिच्या वडलांनी सांभाळलं तसंच. नुकतीच तिनं टेस्ट केली होती व ती यशस्वी झाली. त्यामुळे आता योगाचे क्लास बंद होणार होते. मेहरा कुटुंबाचा एकटेपणाचा वंश पुढे चालू राहिला.

काही महिने सरले. परीच्या कुशीत एक नवा पाहुणा आला. तिने एका गोंडस बाळाला जन्म दिला. त्याचे नाव श्री ठेवण्यात आले.

आणि काही महिन्यांनंतर पुन्हा एकदा योग वर्ग सुरु झाले. नव्हे . .

'श्री योग क्लासेस' सुरु झाले. .

◆◆◆

## 12 धुक्यात हरवलेली दिल्ली

●●●

"दो लफजो कि है ये दिल की कहानी

या है शरारत या है जवानी. . . "

मी मस्त पैकी गाणी ऐकत होतो. तेवढ्यात माझा आय फोन वाजला. मी कुणाचा कॉल आला ते बघायला गेलो.

"साहिल", माझा जुना मित्र. त्याचाच कॉल होता. साहिल आणि माझी कॉलेजची मैत्री. कामानिमित्त तो दिल्लीला राहायला गेला आणि नंतर तिथेच स्थायिक झाला. आज बऱ्याच दिवसांनी त्याचा कॉल आला.

मी उचलला.

"हॅलो. . . " मी

"नमस्कार. . . ओळखलं का ?", साहिल म्हणाला.

"ऑफ कोर्स ! विषय आहे का तो ?", मी.

"कसे आहात मग ?", साहिल चा प्रश्न.

"एकदम मजेत. आपण कसे ? ", मी

माझं उत्तर आणि प्रश्न सोबतचं.

"आमचं कसलं काय, चाललंय ठीकचं. " साहिल

"मग आज आमची आठवण कशी काय आली ?" मी

"खोया खोया चाँद खुला आसमान

आखों मैं सारी रात जायेगी,

हमको भी कैसे नींद आयेगी

तुमको भी कैसे नींद आयेगी. . . "

कुणीतरी पी. सी. वर मोठ्या आवाजात गाणी लावली होती. मी वाकुन पाहिलं, तो नीलच होता. माझ्या मुलाला जुनी गाणी ऐकण्याचा खूपच शौक होता.

मी आवाज कमी करायला सांगितलं.

साहिल- "हॅलो. . . ? हॅलो. . . हॅलो. . . अरे बोल. . ?

मी- हा ! बोल रे. "काय मग कस चाललंय बाकी सगळं?"

साहिल- "काही नाही विशेष. तुला माहितीये का दिल्ली मध्ये काय चाललंय आजकाल. . आता आम्हां सर्वांना इथून स्मार्ट दिल्ली मध्ये शिफ्ट करणार आहेत. "

मी- हो, वाचालं मी ई पेपर मध्ये. हिमालयाच्या कुशीत कृत्रिमरित्या बसवलंय नवीन स्मार्ट दिल्ली. म्हणजे आता पूर्ण दिल्ली बंद करणार का?

साहिल- "हो. एकदम बरोबर!"

मी- "चला, म्हणजे तुम्ही एकदाचे या प्रदूषणातून बाहेर पडणार आणि मोकळा श्वास घेणार. "

साहिल- "हो ना, आणि ते पण हिमालयाच्या कुशीत;

पण काहीही म्हणा. . . जुन्या गावाशी नातं कधी तुटत नसतं. खूप आठवण येईल इथली. इथलं 20 तास धुकं, मास्क लावून जगणं, ऑक्सिजनचे सिलिंडर आणि ते ट्रॅफिक. . . सगळंच. "

मी- "खरंच आहे ! आम्ही पण इथे शिफ्ट झालो तेव्हा असच झालं होतं. "

सहिल- "एनीवेज्. . . जो होता है अच्छे के लिये होता है. "

मी- "मग के नि कुठं घेतली ऍडमिशन?"

साहिल- त्यांनी B. Ed. करायचं ठरवलं आहे. सध्या तोच ट्रेण्ड चालू आहे ना. बाकी सर्व ऑपशन्स तर ब्लॉक झालेत ना आधीच.

मी- "हो ना. इंजीनेरिंग ची कॅपसिटी तर फक्त 5 विद्यार्थी केलीये प्रत्येक कॉलेजसाठी. DSLR फोटोग्राफिच पण सगळं फुल्ल झालंय. "

साहिल- "बरं चल. . . एक अर्जेन्ट काम आहे, ठेवतो फोन. "

मी-"बरं. . . बाय! काळजी घ्या. "

साहिल- "बाय! सी यु सून"

आयफोन ठेऊन मी टीव्ही सूरु केला तर टीव्ही वर तीच बातमी होती-

"FOGGED DELHI"

दिल्लीच्या प्रदूषणाने सगळे रेकॉर्ड मोडले. दिवसातले 20 तास वातावरणात धुकं पसरू लागलं. WHO ने हे शहर निवासासाठी पूर्णपणे बंद करण्याचे आदेश दिले आहेत. त्यातूनच निसर्गाच्या सानिध्यात स्मार्ट दिल्ली बसवण्याचे काम सुरु झाले; पण तोपर्यंत दिल्लीवासीयांना खूप समस्यांना सामोरे जावे लागले.

वाढते आजार, कायम चेहऱ्यावर मास्क, ऑक्सिजन सिलिंडर, वगैरे वगैरे. . .

फायनली लोक आता स्मार्ट दिल्ली मध्ये राहायला जाणार होते; पण तिथला निसर्ग आता किती वेळ टिकून राहणार कि पुन्हा तिथंही दुसरी प्रदूषित दिल्ली तयार होतेय याचीच शंका होती.

तेवढ्यात नील नी पुन्हा आवाज वाढवला-

"आने वाला पल जाने वाला हैं ,

हो सके तो इसको

रोक सको तो रोको. . .

पल जो ये जाने वाला हैं।

आने वाला पल जाने वाला हैं. . . "

◆◆◆

## 13 एका रात्री. .

●●●

बाहेर धो धो पाऊस कोसळत होता. बाहेर काळाकुट्ट अंधार पडला होता. मी सहज TV ऑन केला. . तेवढ्यात सोसायटी च्या चॅनेल वर बातमी झळकली . .

'श्री अपार्टमेंट मधील खालच्या दोन मजल्यांना हाय टाइड चा इशारा . .

सर्वांनी टेरेस वरील कॉमन रूम मध्ये जमावे'

हि अशी न्यूज वर्षातून एकदा तरी यायची . आम्ही १६ व्या मजल्यावर असल्याने निश्चिन्त होतो.

हाय टाइड मुळे अरबी समुद्रातील आमच्या बिल्डिंग चे खालचे दोन मजले काही वेळासाठी पाण्याखाली जाणार होते. याशिवाय आजूबाजूला अनेक टोलेजंग इमारती समुद्रात दिमाखात उभ्या होत्या . महाराजांचे स्मारक आमच्या घरापासून हाकेच्या अंतरावर होते .

मी पिक्चर पाहावा म्हणून चॅनल बदलला त्या चॅनलला लागलेला मुव्ही होता. . . सूर्यवंशम. . .

मला रिमोट आपटावासा वाटला.

मी TV बंद केला.

"ली माझा आय फोन आण" निलने हाक मारली.

"हो डॅड "उत्तर आलं

"लाईट जाईल आज रिचार्ज करायला हवा "असं म्हणत निलने इलेक्ट्रिसिटीचा ऑनलाईन रिचार्ज केला मीटर वर पुढची रिचार्ज डेट झळकली .

बातम्या वाचाव्यात म्हणून मी ई पेपर उघडला

ब्रेनकॉम नावाचं उपकरण बनवणाऱ्या शास्त्रज्ञाला या वर्षीच्या नोबेल पुरस्कार मिळाला होता या ब्रेनकॉम मुळे माणसाला दुसऱ्या माणसाच्या मनातलं ऐकू येतं या उपकरणाचा शोध लागून १० वर्षे झाली पण प्रचंड किमतीमुळे अमेरिकेतच फक्त ५ जणांनी हे विकत घेतले

भारतात तर ते अजून आलंच नव्हतं

पण भारतासाठी हे वर्ष अभिमानास्पद होतं. कारण कितीतरी दशकांनी नोबेल पारितोषिक ओंकार झांजे या भारतीय डॉक्टर वैज्ञानिकाला मिळालं होतं. पुनर्जन्म पंप हेच ते यंत्र ज्यासाठी मानाचा पुरस्कार त्या वैद्याने पटकावला यामुळे हार्ट अटॅक वर मात करता येणार होती . झटका आल्यावर लगेच हा पंप वापरल्यास काही वेळात हृदय सुरळीत चालू लागते . हे म्हणजे पुनर्जन्मासारखंच होतं त्यालाच साजेसं त्याचं नाव पुनर्जन्म पंप . बरं पण हे यंत्र सुद्धा प्रचंड महाग होतं व सामान्य माणसापर्यंत ते अजून आलंच नव्हतं . या पिढीत बालपणीच हृदयविकारचं प्रमाण वाढलेलं त्यामुळं हा शोध अगदी मोलाचा होता.

इतक्यात लीची मॉम ऑफिस मधून आली आणि दुःखी स्वरात म्हणाली

"अहो ऐकलं का शेजारच्या सू च्या घरी गर्दी जमले सर्वांची"

"का ग काय झालं "मी विचारलं.

"बाबा अहो ली चा मित्र सू हार्ट अटॅक ने मरण पावला"

माझ्या हातातला फोन निसटला .

ली ला ही बातमी कळली तेव्हा तो तर सुन्नच झाला.

आम्ही सर्व शोकात बुडालो.

बाहेर अजूनसुद्धा मुसळधार पाऊस कोसळत होता. . .

●◆●◆समाप्त◆●◆●◆

कशी वाटली 2050 ची सफर ?

तुम्हाला नक्कीच आवडली असणार अशी आशा करतो. आवडली असेल तर मनात न ठेवता माझ्या मेल वर लवकर तुमचे अभिप्राय कळवा. काही सूचना असतील तर त्या हि सांगा. तुमच्या सूचनांचे स्वागतच ! आणि हो 2050 सालच्या तुमच्या मनातल्या कल्पना नक्की कळवा.

माझी पुढची कथा लिहिण्यासाठी तुमचे अभिप्राय नक्कीच प्रोत्साहन देतील.

ओंकार झांजे

माझा मेल पत्ता:  omkar.zanje1@gmail.com

Whatsapp: 7770099295

धन्यवाद

# ई साहित्य प्रतिष्ठान

**मराठी** भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणाऱ्यांकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार दोनहजार प्रती छापल्या जात. पाच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी.

आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच दहा लाख वाचकांपर्यंत जातं. वर्षाला चाळीसेक लाख डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर फ़ॉरवर्ड करतात. व्हट्स अप, ई मेल, ॲप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायलीत. सुसाट सुटलित. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठिवरच्या प्रत्येक देशात. रॉकेटच्या वेगाने सुसाट सुटलेल्या मराठीच्या वेगाला आता कोणी थांबवू शकत नाही.

या धूमधडक क्रांतीत सामिल व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही फ़क्त दहा वाचक आणा. ते शंभर आणतील. आणि ते दहाहजार. तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला फ़ुकट पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत. आपल्याला टिव्ही पेपर ची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवू.

“Language is the blood of the soul into which thoughts run and out of which they grow.”

– Oliver Wendell Holmes

www. esahity. com वरून डाऊनलोड करा.

esahity@gmail. com ला कळवून मेलने मिळवा.

किंवा7710980841हा नंबर सेव्ह करून या नंबरला तुमचे नांव व गांवWhatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा.

किंवा ई साहित्यचे app. https://play. google. com/store/apps/details?id=com. esahity. www. esahitybooks या लिंकवर उपलब्ध आहे. तेdownload करा.

हे सर्व मोफ़त आहे.